नि.दि.मु. क्र. १३/२००५
निशाण नं. २४५ लगत
CNR No.: MHSI05-000049-2005

<u>पुढील सरतपास प्रतिवादी क्र. १ ते ३ व ५ तर्फे वकील श्री. बी. एन्. प्रभु यांचे मार्फत</u>

२३. <u>या कामी निशाण ४८ सोबत अ.क्र. ४ येथे पी.टी.आर. उतारा दाखल करण्यात आलेला आहे.</u> **(सदर उतारा सार्वजनिक दस्तऐवज असल्यामुळे त्याला निशाण नं. २५६ देण्यात आले.)** <u>निशाण ४८/१७ ते ४८/२० येथे अनुक्रमे प्रतिवादी क्र. १, २, ४ आणि ५ यांची मुळ मतदार ओळखपत्र आहेत.</u> **(त्यांना निशाण नं. २५७ ते २६० देण्यात आले.)** <u>निशाण ४८/२२ ते ४८/३५ येथे सादर केलेल्या घरपट्टीच्या पावत्या दाखविण्यात आल्या.</u> **)** निशाण ४८/२२ ते ४८/२८ वरील पावत्या दत्ताराम गोविंद मडवळ यांचे नावे असून ते माझे चुलते आहेत. सदर पावत्या या ग्रामपंचायतीकडे कर भरल्याबाबतच्या आहेत. **(सदर पावत्या ग्रामपंचायतीने दिलेल्या असून त्याला निशाण नं. २६१ ते २६७ देण्यात आले.)** निशाण ४८/२९ येथील पावती आत्माराम गोविंद आरोलकर यांच्या नावे असून ते माझे वडिल आहेत. सदर पावत्या या ग्रामपंचायतीकडे कर भरल्याबाबतच्या आहेत. **(सदर पावती ग्रामपंचायतीने दिलेली असून त्याला निशाण नं. २६८ देण्यात आले.)** निशाण ४८/३० येथील पावती प्रतिवादी क्र. १ यांच्या नावे आहे. निशाण ४८/३१ येथील पावती दत्ताराम यांच्या नावे आहे. सदर पावत्या या ग्रामपंचायतीकडे कर भरल्याबाबतच्या आहेत. **(सदर पावत्या ग्रामपंचायतीने दिलेल्या असून त्याला निशाण नं. २६९ व २७० देण्यात आले.)** निशाण ४८/३२ येथील पावती प्रतिवादी क्र. १ यांच्या नावे आहे. सदर पावत्या या ग्रामपंचायतीकडे कर भरल्याबाबतच्या आहेत. **(सदर पावती ग्रामपंचायतीने दिलेली असून त्याला निशाण नं. २७१ देण्यात आले. )** निशाण ४८/३३ येथील पावती दत्ताराम गोविंद आरोलकर यांच्या नावे आहे. निशाण ४८/३४ व ४८/३५ येथील पावत्या प्रतिवादी क्र. १ यांच्या नावे आहे. सदर पावत्या या ग्रामपंचायतीकडे कर भरल्याबाबतच्या आहेत. **(सदर पावत्या ग्रामपंचायतीने दिलेल्या असून त्याला निशाण नं. २७२ ते २७४ देण्यात आले.)** निशाण ४८/३६ ते ४८/५१ येथे विजबीले दाखल करण्यात आलेली आहेत. ती बिले एम्.एस्.ई.बी. कडून प्राप्त झालेली आहेत. **(सदर बिलांना निशाण नं. २७५ ते २९० देण्यात आले.)** निशाण ४८/५२ येथे प्रतिवादी क्र. १ यांनी तालुका निरीक्षक भुमी अभिलेख यांना

दिलेले पत्र आहे. **(सदर पत्राला निशाण नं. २९१ देण्यात आले.)** निशाण ६१/१ येथे वादी यांनी दावा जमिनीमध्ये बेकायदेशीर वृक्षतोड केल्याबाबत तक्रार अर्ज मी केला होता. सदर अर्जावरती माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्याच्यावर संबंधित शासकीय अधिकारी यांच्या पोहोच घेतल्याबाबतची सही व शिक्का आहे. त्याची मुळ प्रत संबंधित कार्यालयांकडे आहे. (सदर कागदाला वादीच्या वकिलांनी अशी हरकत घेतली की कागदावरील पोहोचवर निशाण देता येईल. आदेश– **प्रस्तुतचा कागद हा पुराव्याचे कायद्याचे कलम ६५ मधील तरतुदींची पुर्तता करत असल्यामुळे त्याला पुराव्यात वाचता येईल. सदर तक्रार अर्जाला निशाण नं. २९२ देण्यात आले.)** निशाण ६१/२ येथे वादी यांनी दावा जमिनीमध्ये बेकायदेशीर वृक्षतोड केल्याबाबत तक्रार अर्ज पोलीस हेड कॉ. शिरोडा दुरक्षेत्र व पोलीस निरीक्षक वेंगुर्ला यांच्याकडे मी केला होता. सदर अर्जावरती माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्याच्यावर संबंधित शासकीय अधिकारी यांच्या पोहोच घेतल्या बाबतची सही व शिक्का आहे. त्याची मुळ प्रत संबंधित पोलीस अधिकारी यांचेकडे आहे. (सदर कागदाला वादीच्या वकिलांनी अशी हरकत घेतली की कागदावरील पोहोचवर निशाण देता येईल. आदेश– **प्रस्तुतचा कागद हा पुराव्याचे कायद्याचे कलम ६५ मधील तरतुदींची पुर्तता करत असल्यामुळे त्याला पुराव्यात वाचता येईल. सदर तक्रार अर्जाला निशाण नं. २९३ देण्यात आले.)**

**मध्यांतराची वेळ झालेने उर्वरीत सरतपास दुपारचे सत्रापर्यंत तहकुब.**

**श्रवणोत्तर स्विकृत**

**दिनांक :– १३/१२/२०१९.** **दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वेंगुर्ला.**

**दुपारचे सत्रानंतर पुढील सरतपास प्रतिवादी क्र. १ ते ३ व ५ तर्फे वकील श्री. बी. एन्. प्रभु यांचेमार्फत.**

२४. उप वनसंरक्षक सावंतवाडी वनविभाग यांनी मी केलेल्या तक्रारी अर्जास अनुसरुन मला पत्र पाठविले आहे. ते पत्र मी या कामी निशाण ७०/१ येथे हजर केलेले आहे. त्याचेवर संबंधित उप वनसंरक्षक सावंतवाडी यांची सही आहे. **(सदर**

**कागद सार्वजनिक दस्तऐवज असल्याने सदर पत्राला निशाण २९४ देण्यात आले.)** ते पत्र ज्या लखोटयातून आले त्याचा मुळ लखोटा या कामी निशाण ७०/२ येथे हजर आहे. त्याचेवर पोष्टाचा शिक्का आहे आणि फॉरेस्ट ऑफिसरचा सही शिक्का आहे. **(सदर लखोटयाला निशाण नं. २९५ देण्यात आले.)** दावा जमिनीमध्ये आमच्या कुटुंबाची कुळ वहिवाट आहे असा ठराव होवून मिळावा म्हणुन तशा आशयाचा अर्ज आम्ही ग्रामपंचायत आरवली यांचेकडे केला होता. त्या पत्राची स्थळप्रत मी हजर केलेली आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्याच्यावर संबंधित ग्रामपंचायतीचे लिपीक याची पोहोच दिल्याची सही व शिक्का आहे. त्याची मुळ प्रत संबंधित ग्रामपंचायत यांचेकडे आहे. (सदर कागदाला वादीच्या वकिलांनी अशी हरकत घेतली की कागदावरील पोहोचवर निशाण देता येईल. आदेश— **प्रस्तुतचा कागद हा पुराव्याचे कायद्याचे कलम ६५ मधील तरतुदींची पुर्तता करत असल्यामुळे त्याला पुराव्यात वाचता येईल. सदर तक्रार अर्जाला निशाण नं. २९६ देण्यात आले.)** आमच्या अर्जाला अनुसरुन ग्रामपंचायतीने जे उत्तर दिलेले आहे ते मी निशाण ७३/२ येथे सादर केलेले आहे. ते मला ग्रामपंचायतीकडून प्राप्त झालेले आहे. त्याचेवर सरपंचाचा सही व शिक्का आहे. (**ग्रामपंचायतीच्या उत्तराला निशाण नं. २९७ देण्यात आले**.) या कामी निशाण १०८/१ येथे प्रतिवादी क्र. १, ३ ते ५ यांनी मला करुन दिलेले अखत्यारपत्राची छायांकित प्रत सादर केलेली आहे. त्याची मुळ प्रत या कामी सादर केली होती. मात्र ती अन्य कामी लागेल म्हणुन तसा अर्ज करुन ती परत घेतलेली आहे. त्याची मुळ प्रत मी हजर करेन. मी निशाण ७५ सोबत अ.क्र. १ येथे वृक्ष अधिकारी दोडामार्ग यांनी दावा जमिनीतील अवैध झाडतोडी संदर्भात वादी नं. २ यांचे विरुध्द दंडाचा आदेश केला होता. त्याची छायांकित प्रत या कामी सादर आहे. त्याची मुळ प्रत सादर केली होती, परंतु ती अर्ज करुन न्यायालयाकडून परत घेतली होती.

## उलटतपास वादी तर्फे वकील श्री. भणगे एस्. एन्. यांचे मार्फत

२५. मी दावा मिळकतीचा सातबारा पाहिलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की दावा मिळकत ही श्रीदेव वेतोबा देवस्थान यांचे मालकीची आहे. हे म्हणणे खरे आहे की सातबारावरती वादी याची कुळ म्हणुन नोंद दिसून येते. मात्र माझे म्हणण्याप्रमाणे

सांगतो की ती नोंद चुकीची आहे. हे म्हणणे खरे नाही की सदर नोंद चुकीची आहे म्हणुन मी त्या नोंदीविरुध्द कोणत्याही प्रकारचे अपिल केलेले नाही. मी पुन्हा सांगतो की त्या नोंदीबाबत अपिल केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की वादी यांची सातबारावरील कुळ म्हणुन नोंद १९४८ साली झालेली आहे. मी चवथीपर्यंत शिकलेलो आहे. मी पहिली, दुसरी व तिसरी उत्तीर्ण होवून चवथीमध्ये गेलेलो आहे. (साक्षीदाराला निशाण ८ वरील फेरफाराचा उतारा मधील नोंद वाचून दाखविण्यात आली.) हे म्हणणे खरे आहे की सदर फेरफारामध्ये वादी यांची कुळ म्हणुन नोंद झाल्याबाबत दिसून येते. मात्र सदर नोंद खोटी आहे. हे म्हणणे खरे आहे की सदर नोंद चुकीची आहे म्हणुन मी त्याविरुध्द कोठेही अपिल केलेले नाही.

२६. मी याकामी आमची कैफियत दिलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की ती वाचून मी त्याचेवर सही केली आहे. हे म्हणणे खरे आहे की दावा मिळकतीपासून अर्धा किमी अंतरावर माझे रहाते घर व मांगर आहे. हे म्हणणे खरे आहे की आमचे घर व मांगर ज्या जागेवर आहे ती जमीन सातबारा सदरी आमचे नावे नाही.

**वादीतर्फे वकिलांचे विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

**श्रवणोत्तर स्विकृत**

DISTRICT COURT, MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by Vinayak Dattatray Patil
Date: 2019.12.13 17:20:00 +0530

दिनांक :– १३/१२/२०१९.

दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वेंगुर्ला.